# भारत—कोरोनाचे आर्थिक संकट

**डॉ. अरुण चव्हाण**, सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग भोगावती महाविद्यालय, भोगावती.

**प्रस्तावना:**

भारताच्या चालू आर्थिक परिस्थितीचा विचार करता जगभरातील मंदी बरोबरच भारतामध्ये देखील आर्थिक मंदीचे वातावरण निर्माण झाले होते. अशामध्येच कोरोनाचे संकट जगभर पसरले. २०२०—२१ च्या अर्थसंकल्पामध्ये रुतलेले अर्थचक्र गतिमान होण्यासाठी १.७० लाख कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. त्याचे परिणाम दिसण्या अगोदरच कोरोनाचा प्रसार झाल्याने संपूर्ण जगभर लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाली. यामुळे एजन्सी मूडीज इन्व्हेस्टर्स सर्व्हीसने चालू आर्थिक वर्षात देशाचा विकास दर शून्य टक्के राहण्याचे भाकीत केले आहे. अशा परिस्थितीत भारतासमोर वित्तीय सूट, सरकारी कर्जात झालेली वाढ, वित्तीय क्षेत्राची नाजूक अवस्था व या सर्वांमुळे रुतलेले अर्थचक्र अशी सरकारसमोर आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली. आर्थिक वृध्दीच्या गुणवत्तेमध्ये घसरण झाल्याने ग्रामीण कुटुंबांची आर्थिक स्थिती घसरली. अपेक्षेपेक्षा उत्पादकता कमी झाली, परिणामी रोजगार निर्मिती देखील कमी झाली. लॉकडाऊनच्या अगोदरच भारतीय अर्थव्यवस्था अशा नाजूक परिस्थितीतून जात होती. शेती उत्पादनात म्हणावी त्या प्रकारे वाढ नव्हतीच तसेच शेतमालाला बाजारपेठ चांगल्या प्रकारे उपलब्ध होत नव्हती. या सर्वांमुळे शेती व्यवस्था व त्यावर आधारित शेतीमाल उद्योगधंद्यांचे निराशाजनक चित्र या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस दिसत होते.

कोरोनाच्या परिस्थितीमध्ये जगाचा विचार केल्यास जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केलेल्या कोरोनारुपी जागतिक अर्थव्यवस्थेला ५.८ ते ८.८ लाख कोटी डॉलर्सचा फटका बसू शकतो. असा अंदाज आशियाई विकास बँक (ADB) ने बांधला आहे. कोरोनाचा उगम झालेल्या चीनमध्ये १.१ ते १.६ लाख कोटी डॉलर्सचे नुकसान झाले असावे. कोरोना संकटाचा सर्वात वाईट परिणाम दक्षिण आशियाई राष्ट्रावर होत असून त्यांचे सकल राष्ट्रीय उत्पादन १४२ ते २१८ अब्ज डॉलर इतकेच राहण्याची शक्यता आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला बसलेल्या फटक्याची याची तुलना केली असता सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ६.४ ते ९.७ टक्क्यांबरोबर केली जात आहे. या सर्वांचा निर्यातीशी संबंध असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर लॉकडाऊनची परिस्थिती निर्माण झाल्याने भारतीय उत्पादनाची मागणी खूपच घटली. २०२० च्या एप्रिलमध्ये १०.३६ अब्ज डॉलर इतकी भारताकडून निर्यात झाली. वार्षिक तुलनेत यामध्ये तब्बल ६०.२८ टक्के घसरण दिसून येते. तर आयात ५८.६५ टक्के झाली ती १७.१२ अब्ज डॉलर इतकी आहे.

भारतातील घटकराज्याचा विचार केल्यास लॉकडाऊनमुळे एप्रिल महिन्यात राज्यांना ९७.१०० कोटी रुपयांचा फटका बसला असा अंदाज इंडिया रेटींग एजन्सीने वर्तविला आहे. वास्तविक नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात या महिन्यापासून होते. यामुळेच सुरुवातीस सर्व घटकराज्यांना आर्थिक फटका बसल्याचे जाणवते. वास्तविक लॉकडाऊनमुळे उत्पादनात अडचण व्यवसाय साखळी तुटणे, विमान वाहतूक, पर्यटन, हॉटेल उद्योग आणि हॉस्पिटॅलीटी या क्षेत्रावर प्रामुख्याने परिणाम झाला. उद्योग व व्यवसाय यासमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या. केंद्र व राज्य सरकारना रोखीच्या अडचणीचा सामना करावा लागत असून यामध्येच कोरोनामुळे घटकराज्यांना असे आरोग्यविषयक प्रचंड खर्च करावा लागत आहे. घटक राज्यांना प्रामुख्याने सात प्रकारे महसूली उत्पन्न मिळते. यामध्ये जीएसटी, राज्य व्हॅट (पेट्रोलियम पदार्थावर), राज्य उत्पादन शुल्क (प्रामुख्याने दारु), नोंदणी शुल्क, वाहन कर, ऊर्जा कर, आणि इतर करांच्या समावेश होतो. यामध्ये महाराष्ट्र गोवा, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यांचे सर्वाधिक महसूली नुकसान झाले आहे. याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे या राज्याच्या एकूण महसूली उत्पन्नापैकी ६५ ते ७६ टक्के उत्पन्न आपल्याच स्त्रोतामधून मिळते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यसरकारचे अर्थचक्र रुतले. त्यामुळे सरकारी तिजोऱ्या रीकाम्या झाल्या. राज्यांनी विकास कामे बाजूला सारुन सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि निवृत्तांचे पेन्शन आधी देण्याचे प्रयत्न सुरु केले. इंडिया रेटींग ॲन्ड रिसर्चने आर्थिक वर्ष १७—१८ आणि १९—२० चे आर्थिक विश्लेषण करुन काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे राज्याच्या एकूण उत्पन्नापैकी ४६ टक्के उत्पन्न कराच्या वसूलीतून होते. २६ टक्के उत्पन्न केंद्रीय करामधून मिळते तर २० टक्के हिस्सा केंद्रीय अनुदानातून मिळतो. राज्यांना ८ टक्के उत्पन्न कराव्यतिरिक्त महसूलातून मिळते. यावरुन

महसूलाचे विकेंद्रीकरण केल्यास ३९.९ टक्के हिस्सा राज्य जी.एस.टी.चा असतो. २१.५ टक्के उत्पन्न व्हॅटमधून मिळते. (बहुतांश पेट्रोल व डिझेल विक्रीतून), ११.९ महसूल दारुच्या उत्पन्नातून, ११.२ टक्के महसूल मालमत्ताच्या नोंदणीतून, ५.७ टक्के हिस्सा वाहनाच्या नोंदणीतून आणि ९.८ टक्के इतर मार्गांनी मिळतो. हे सर्व राज्यांचे अर्थचक्र कोरोनामुळे रुतून बसले. याशिवाय आरोग्य विषयक खर्च, कामगारांना इच्छित स्थळी पोहचविण्याचा खर्च, रेशन वाटप मोफत करण्याच्या खर्च, आरोग्य विषयक साधने आयात करण्याचा खर्च यामुळे केंद्र सरकार बरोबरच राज्य सरकार खूपच भरडली जाऊ लागली.

या सर्वांचा परिणाम म्हणूनच भारतासमोर आर्थिक आव्हान निर्माण झाली आहेत. त्याचा विचार करता २०१९–२० च्या तिसऱ्या तिमाहीत सकल राष्ट्रीय उत्पन्न मागील सहा वर्षाच्या तुलनेत सर्वात खालच्या स्तरावर आले. त्यामध्ये कोरोनाचा विचार करता लॉकडाऊनमुळे संपूर्ण अर्थव्यवस्थेला खीळ बसली. उद्योग क्षेत्रापुढे अस्तित्वात प्रश्न निर्माण झाला. सोळा उद्योग क्षेत्रावर अत्यंत वाईट परिणाम झाला. पाच कोटी लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणारे हवाई वाहतूक, पर्यटन आणि हॉटेल उद्योग आज अडचणीत आले. यामुळे लोकांच्या जगण्यास नव्हे तर विचारात देखील न भूतो न भविष्यती बदल होतील. बँकींग क्षेत्र बंद पडलेले उद्योगधंदे लक्षात घेऊन भारतीय रिझर्व्ह बँक व सरकारने जोखीम करण्यासाठी रेपो दरात व रिव्हर्स रेपो दरात कपात केली. बँकेच्या वित्तीय स्थैर्य अहवालात थकीत कर्जाचे प्रमाण ९.९ टक्यांवर जाण्याची शक्यता वर्तिवली आहे. यामुळे थकीत कर्जाचे प्रमाण वाढतच जाणार आहे. आजच्या घडीला बँकांकडे पुरेसा निधी उपलब्ध आहे. परंतु कर्ज घेण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. कारण उद्योग धंद्यांना भविष्यात उरले नाही. यामुळे ठेवीवरील व्याजदर कमी होत जातील. बँकांना उत्पन्न वाढीसाठी डीजिटल व्यवहाराचे शुल्क, इतर दंडात्मक शुल्क, विशिष्ट सेवा शुल्क आणि लॉकरचे भाडे वाढविण्याशिवाय पर्याय नसेल. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पन्नात ३० ते ३५ टक्के हीस्सा असल्याने सरकारने यामध्ये उपाययोजना करण्याचे आव्हान बनले आहे.

**मध्यम व लघु उद्योग क्षेत्र:**

उद्योगाच्या बाजारपेठेत ग्राहकाच्या क्रयशक्तीमध्ये झालेली कमी, पुरवठा साखळीत निर्माण झालेले अडथळे, स्थलांतरीत कामगारांचे निर्माण झालेले प्रश्न यामुळे सरकार समोर आव्हान निर्माण झाली आहेत. यामधूनच आर्थिक असुरक्षिततेपोटी ग्राहकांनी रोख रक्कम वाढवण्यास सुरुवात केल्यास बँकांसमोर ठेवींचा प्रश्न उभा राहिला.

देशातील उत्पादन, सेवा क्षेत्रामधील लघू व मध्यम व्यवसाय बंद आहेत. परंतु सुरु झाल्यानंतर त्यांना खूप अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. यामध्ये कच्च्या मालाची उपलब्धता व त्याच्या पुरवठयात सातत्य असणार आहे. कामगारांचे स्थलांतर झाल्याने कारखाना नव्याने सुरु करणे आव्हानच असणार आहे. मोठया कारखानदारांकडून येणे वसूल न झाल्याने लघु उद्योग मालकांकडे भांडवलाची कमतरता निर्माण होणार आहे. पावसाळयाच्या सुरुवातीस कशी परिस्थिती असल्याने संपूर्ण पावसाळयाभर इतरवेळी देखील मंदीची स्थिती असते. पावसाळयात निर्यात व्यवस्था कोलमडल्याने लघु व मध्यम उद्योग डबघाईला येतील. बाजारपेठेतील मालाची गरज व उत्पादित माल यांची सांगड या उद्योगांची घालणे गरजेचे आहे. सरकारने उत्पादित मालांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजरपेठ उपलब्ध करुन द्यावी लागेल गेल्या तीन महिन्यामध्ये कारखाने बंद असल्याने उद्योगांच्यामध्ये कारखाना सुरु करण्यात रस नसल्याने दिसते. परिणामी बेरोजगारी वाढू शकते.

**शेती क्षेत्र:**

लॉकडाऊनमध्ये अत्यावश्यक क्षेत्रात शेती कामास, शेती माल विक्रीस मुभा असली तरी भाजीपाला, फलोत्पादक यांच्यातील विक्री साखळी विस्कळीत झाल्याने शेतकरी हवालदिल झाला. बाजारपेठ व हमीभावा अभावी शेतकऱ्याचे आर्थिक गणित कोलमडले. शेती क्षेत्राबाबत मुळातच देशात उदासिनता आहे. मात्र कोणत्याही अरिष्टाचा सर्वप्रथम फटका शेती क्षेत्राला बसतो. मात्र भांडवलशाही अर्थव्यवस्थेत शहरांची होणारी वाढ, शहराकडे होणारे मजूराचे स्थलांतर यामुळे शेती क्षेत्रात रोजगार उपलब्ध असून देखील मजूरांचे स्थलांतर शहराकडे होताना दिसते. परंतु कोरोनामुळे ही भांडवलशाही व्यवस्था दोन तीन महिने पोटाची आग भागवू शकत नाही. हे लक्षात आल्यानंतर गावाकडे शेतमजूर खूप मोठया प्रमाणात स्थलांतरीत झाले. मात्र नव्वदच्या दशकानंतर ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण,

कृषी औद्योगिक धोरणाचा विस्तार याकडे लक्ष दिले गेले नाही. शहरातील बकाल झोपडपट्ट्या वाढविण्यापेक्षा कृषी केंद्रीत उद्योग धंद्यांना चालना देऊन खेडी आर्थिकदृष्टया स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतमालाला हमीभाव नसणे, बी–बियाणे, रासायनिक खते, यांत्रिकीकरण यामध्ये प्रचंड खर्च, बाजारपेठेवरील सरकारी नियंत्रण, व्यापारी, दलाल आडत ही शोषण करणारी व्यवस्था शेतकऱ्यांचे श्रम देखभाल, वर्षभराचा खर्च या सर्व मोठी लक्षात घेऊन शेती मालाचा हमीभाव ठरविणे गरजेचे आहे.

सिंचन क्षेत्रात वाढ करणे, वीज वितरणातील असमतोल दूर करणे, सौर ऊर्जा वापराकडे लक्ष देणे, कीटक नाशके रासायनिक खतांच्या अमर्याद वापरावर बंधने, पायाभूत सुविधा, शीतगृहांची निर्मिती, धान्य गोदामे नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, हानी कमी करण्याचे तंत्रज्ञान विकसीत करणे, थोडक्यात शेती क्षेत्राला रोजगार म्हणून विकसीत करणे.

थोडक्यात कोरोनामुळे अशाश्वत झालेला विकास भांडवलशाही व्यवस्थेत उद्योगधंद्यांना आलेले महत्वख चंगळवादाला दिले जाणारे महत्व या सर्व गोष्टी कमी होऊन वास्तवात मानवी गरजा त्यांच्यावर भर देऊन जगण्यासाठी आवश्यक गोष्टींचा विकास करणे गरजेचे बनले आहे. शेती, शिक्षण, आरोग्य याकडे गेल्या तीन दशकामध्ये झालेले दुर्लक्ष आजच्या बिकट अवस्थेला कारणीभूत आहे. बँकींग क्षेत्र, लघु व मध्यम उद्योग क्षेत्र, शेती क्षेत्र या क्षेत्रामध्ये जागतिकीकरणानंतर खूप मोठया प्रमाणात बदल झाले. परंतु हे बदल मानवी जीवनाला साकार करण्यात कीतपत यशस्वी झाले हे कोरोनाच्या संकटानंतर जास्त अपयशी झाल्याने दिसून आले. कोटयावधीचे कर्ज वाटप केल्यानंतर या कर्जाचे हप्ते कारखानदाराकडून मिळू शकत नाहीत. बँकांकडे ठेवी पडून असून देखील कर्जदार उपलब्ध नाहीत. लघु व मध्यम उद्योगधंदे कच्च्या मालाची साखळी विस्कटल्याने तसेच मजुरांनी स्थलांतर केल्याने अडचणीत आल्याने दिसते. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष केल्याने कोरोनाच्या काळात शेतीच्या मर्यादा स्पष्ट झाल्या तरीही केवळ शेती क्षेत्रच इतक्या मोठया देशातील लोकसंख्येचे पोट भरण्यासाठी सक्षम आहे. हे दिसून आले. मात्र भारतामध्ये येणाऱ्या काळात शेती, शिक्षण व आरोग्य या गोष्टींकडे लक्ष दिले तरच मानवी जीवन सुसहय होणार आहे.

**संदर्भ सुची:**

1- https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019 pm
2- https://covid19.who.int/region/searo/country/in ,
3- https://www.who.int/news-room/q-a-detail/q-a-coronaviruses
4- **https://t.me/t.me /skdeolankar१**
5- **https://t.me/skdeolankar**
6- **HTTPS://maharashtra/7.com**
७. दै. लोकसत्ता, दि. २२/०४/२०२० अग्रलेख
८. महाराष्ट्र टाईम्स, दि. २६/०४/२०२० अग्रलेख